*कथा क्रमांक ७*

# मैत्री

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत मी चावीने घराचं दार उघडलं आणि ... घरात पाउल टाकणार तोच मागून "वाचवा मला  वाचवा, अरे मारू नका रे मला कुणी वाचवा " - हे शब्द कानावर आले. मागे वळून पाहिले तर साधारण पन्नाशीतील एक बाई काकुळत्या नजरेने आणि भेदरलेल्या भावाने माझ्याकडे पहात होती. तिच्या मागे पाच सहा मुलं हातात दगड व काठ्या घेऊन उभी होती. मागचा पुढचा विचार न करता पुढे सरसावून मी प्रथम त्या मुलांना ओरडून तिथून हाकलून लावलं व मग  त्या बाई कडे पाहिलं तेव्हा तिला कुठे तरी पाहिले असल्याचं मला अंधुकसं आठवलं. मी तीच्य जवळ जाउन तिच्या पाठीवरून हात फिरवत तिला दिलासा दिला.तिचं नाव विचारल  तर ती प्रतिमा असं म्हणाली. माझ्या अंगावर सरकान कटाच आला. अगं बाई! ही देशपांड्यांची प्रतिमा तर नाही? हो हो नक्कीच. ह्यात काही शंकाच नाही. Oh My God! ही अशी काय झाली आहे ? माणूस एवढा बदलू शकतो? माझा डोकं तर बाधीरच झालं होतं.

पण लगेच भानावर येउन मी तिला घरात आणलं. सबंध ओली चिंब झाली होती पाउसात. मी तिला बदलायचे कपडे दिले, आणि मी हि कपडे बदलायला आत गेले. आणि तिथूनच माझी एक लहानपनापसुंची मैत्रीण आहे अलका, तिला फोन  केला. तिला हा आत्ताचा घडलेला प्रसंग सांगून आता प्रतिमा माझ्याकडे असल्याचे सांगितले. अल्काने मला वीस ते पंचवीस मिनिटात माझ्याकडे येण्याचे आश्वासन दिले.

प्रतिमा  तिथेच एका खुर्चीवर मान खाली घालून बसली होती. मी तिला विचारलं, " अगं प्रतिमा, मला ओळखलस का? नीट बघ न. अगं मी शिलू -शिलू प्रधान." तिने फक्त माझ्त्याकडे पाहिलं.

तिच्या डोळ्यात मला काही ओळख दिसली नाही. हीच प्रतिमा लहानपणी एवढी गोड, सुंदर होती. सगळ्यात हुशार आणि मुख्य म्हणजे सगळ्यांना हवी हवीशी वाटणारी, लहान मुलांचे लाड करणारी, मोठ्यांशी आदबीने वागणारी अशी होती. नाच तर खूपच छान करायची. पूर्वी आम्ही वाडीत रहात होतो; ही एवढी मोठी सोसायटी नव्हती. वाडीतल्या प्रत्येक कार्यक्रमात हिरहिरीने भाग घ्यायची. मग ते धावा पाळीचे खेळ असोत, बसून पत्ते असोत, dance असोत वा  मुलांच्या बरोबर गोट्या, विटी दांडू वा क्रिकेट खेळायचे असो. प्रतिमा आपली पुढे असायची. अभ्यासातही चांगली होती, त्या मुळे शाळेतही सगळ्या शिक्षकांची लाडकी होती. कामाच्या बाबतीतही नेहमी म्हणायची, " कुठलाही काम हातात  घेतल्यावर अर्धवट सोडायचा नाही. शेवट पर्यंत जायचं." ह्या शिकवणीची तिला केव्हा सवय झाली, ह्या सवयीचा स्वभाव झालं हे तिचं तिला ही समजलं नाही. पुढे सगळ्या मुलांच्या नाझरा तिच्यावर असायच्या. खरोखरीच फार सुंदर दिसायची. पण मग

माशी कुठे शिंकली? माझ्या डोक्यातले विचार जातंच नव्हते. आमच्या दोघींचा एक एक कप चहा झाला. आणि आता अलका येईल म्हणून, एकीकडे भज्जीची तयारी करत होते.
टिंग ~~तोंग~~टिंग~~तोंग! दाराची बेल वाजली. जिची एवढी आतुरतेनी वाट बघत होते ती अलका आली. आम्ही कधी एकमेकींना बिलगलो ते समजलच नाही. पण माझ्या डोळ्यात मात्र पाणी आणि नजर प्रतिमावर होती. जणू माझे डोळे अलकाला विचारात होते, " हे असं काय झालं ग? मी माझं लग्न झाल्यावर अमेरिकेत निघून गेल्यामुळे  हिच्या बाबतीतलं माझ्या काही कानावर आलच नाही. सो sad - खूप वाईट वाटतं.

” हिच्या बाबतीतलं माझ्या काही कानावर आलंच नाही. सो sad! खूप वाईट वाटते.” पण प्रत्यक्ष न बोलताही अलकाला माझ्या डोक्यातलं वादळ जाणवलं. डोळ्यांच्या इशाऱ्यानं तिनं मला गप्प केलं. उठून ती अमिताजवळ जाऊन बसली न् तिचा हात हातात घेऊन थोपटत राहिली. प्रतिमा अलकाकडे आणि माझ्याकडे आळीपाळीने पहात होती. ओळख पटल्याचा एकही भाव तिच्या चेहेऱ्यावर नव्हता. अलकानेच शेवटी बोलायला सुरुवात केली.

" प्रतिमा, किती दिवसांनी भेटलीस ग! मी लग्न होऊन अहमदाबादला आणि शीलू अमेरिकेला गेली. आपल्या तिघींचा ग्रुप त्रिवेणी म्हणूनच ओळाखला जायचा. आठवतंय? नाटकं काय केली, वक्तृत्व स्पर्धा काय, काय मजा यायची ना. सगळीकडे नंबर मात्र तूच पटकवायचीस. 'भावबंधन'मध्ये तू लतिका होतीस. तुझ्या ' मुलींना कुंकू लावताना मध्य बरोबर सापडतो' अशा अर्थाच्या एका वाक्याला काय कडाडून टाळ्या पडल्या होत्या. अजून आवाज कानात घुमतोय."

अलकाचे ते वाक्य संपते ना संपते तोच प्रतिमा ताडकन उभी राहिली. हातवारे वेड्यासारखे करत ओरडायला लागली. "आठवलं आठवलं पण तो घनःश्याम कुठे गेला? अशोक वैद्य काय मस्त काम करायचा गं. He was so handsome. I really miss him. तू.. तुम्ही ओळखता का त्याला? मला भेटायचंय त्याला. किती वर्षं झाली त्याला भेटून!"

अलका ते ऐकून स्तब्ध झाली. काय बोलावे तेच तिला कळेना. मी आपली दोघींकडे टकमका पहात राहिले. अलकाने मला खुणावलं. आम्ही दोघी किचनमध्ये गेलो. अलका हलक्या आवाजात सांगू लागली, " शीलू, तुलाही अशोक वैद्य आठवतोय ना? ही म्हणतेय किती वर्षं झाली त्याला भेटून. बकवास. दुसरं काय? अगं, हिचा नवरा आहे तो."

"काय?" आता ओरडायची पाळी माझी होती. "पंचवीसेक वर्षांपूर्वी दोघांनी घरच्यांच्या म्हणजे हिच्या आई-वडिलांच्या विरुद्ध जाऊन लग्न केलं." अलका सांगू लागली. " माझी बहीण इथे गावातच असते. तिच्याकडून कळलं सगळं मला. ही प्रतिमा म्हणजे प्राइझ कॅच. हिच्यामागे किती मुलं घोटाळायची, माहीतच आहे तुला. खूप चांगली स्थळं सांगून येत होती हिला. पण हिचं त्या अशोकवर प्रेम. प्रतिमाच्या आई-वडिलांना तो तितकासा पसंत नव्हता. कारण त्याचं वागणं एकंदर काही ठीक नव्हतं. 'तू नही और सही' अशा थाटात वेगवेगळ्या मुलींबरोबर दिसायचा. प्रतिमाला सगळ्यांनीच खूप समजवायचा प्रयत्न केला पण तिने ऐकलं नाही. त्यांच्या लग्नाच्या सुरुवातीच्या दिवसात अशोक थोडा बरा वागत होता पण हळूहळू नंतर त्याचे मित्रमैत्रिणी बदलत गेले. तशात प्रसिद्ध नट व्हायची स्वप्ने

तो पाहू लागला. त्याच्या विश्वाचा परिघ वाढत चालला. लोक काहीबाही बोलत. आज हिच्याबरोबर दिसला, काल दुसऱ्याच कोणीबरोबर. प्रतिमाला हे सगळं असह्य होऊ लागलं. मी मध्येच अलकाला थांबवलं. म्हणून ही अशी भ्रमिष्ट झालीय का? असा विचार आला मनात. माझ्या मनातलं ओळखून अलका म्हणाली, " अशोकने अखेर मर्यादा ओलांडली. नवीन नवीन पार्ट्यांना जाताना नवीन मैत्रीण घेऊन जायला लागला आणि 'माझी पत्नी' म्हणून ओळख करून द्यायला लागला. हे प्रतिमाच्या कानावर आलं. दोघांचं कडाक्याचं भांडण झालं. प्रतिमा तक्रार तरी कोणाकडे करणार? आई वडील तर म्हणालेच असते - तरी आम्ही आधी सांगत होतो. त्याचा छंदीफंदीपणा दिसतच होता."

मी अलकाला म्हटलं, " असं असूनही ही अजून त्याला विसरत नाहीय. काही सेल्फ-प्राइड आहे की नाही? "

अलका सांगतच होती, "त्यांचं जेव्हा कडाक्याचं भांडण झालं तेव्हा प्रतिमा चिडली होती. संतापून शिव्या देत राहिली. घराच्याबाहेर मुले उभी होती, त्यांना तो तमाशा वाटला. ती मुलं तिची नक्कल करू लागली. ही आणखीच चिडली. अशोक मात्र मानभावीपणे गप्प राहिला. तेव्हापासून ही बाहेर पडली रे पडली की ती मुलं त्रास द्यायला लागतात. प्रतिमाचं वागणं बदललं. डोक्यावर हळूहळू परिणाम होऊ लागला. आता पराकोटीला गेलंय प्रकरण. नाटकातला घनःश्याम तिच्या आयुष्यातला ही खलनायकच ठरला. "
अलका आणि मी बाहेरच्या खोलीत आलो. प्रतिमा अजून ही शून्यवत् होती. दार ठोठावल्याचा आवाज आला म्हणून दार उघडून पाहते तर ती मघाचीच मुलं. हातात काठ्या तश्याच. त्यातला मोठा होता तो म्हणाला, "आम्ही रोज त्या मावशींना सतावतो, धमक्या देतो. आम्हाला पैसे मिळतात त्याचे. अशोककाका देतात पैसे."

गोष्ट 7_3

त्या मुलांनी जे सांगितले ते ऐकून आम्ही दोघी अवाक् झालो. त्या मुलांना रागावण्याचेही भान आम्हाला राहिले नाही. अशोक इतक्या खालच्या पातळीवर जाऊन वागेल यावर आमचा विश्वासच बसत नव्हता. आम्ही ठरवले की अशोकने प्रतीमाच्या बाबतीत नक्की काय केले आहे ते शोधलेच पाहिजे. आम्ही प्रथम तिला शांत केले आणि ठरविले की तिला काही दिवस आपल्याबरोबर ठेवून घेऊ.

“तू पण आता अमदाबादहून इथच आली आहेस आणि मलाहि सहा महिने इथेच काढायचे आहेत, या गोष्टीचा छडा लावलाच पाहिजे ग . असे कर तू ही ये ना ३-४ दिवस इकडेच.” मी अलकाला म्हणाले. अलकाने ही लगेच त्या गोष्टीला दुजोरा दिला.

प्रतिमा एरवी शांत असायची. काही बोलायची नाही. निमुटपणे सांगितले ते सगळे करायची आणि सुन्नपणे कुठेतरी हरवल्या सारखी बसून रहायची. अशोक ३-४ दिवस शूटिंग साठी बाहेरगावी गेला होता असे आम्हाला कळले होते त्यामुळे तेव्हढे दिवस तरी प्रतिमाची चौकशी कोणी करणार नव्हते.

आम्ही मुद्दाम तिला बोलते करायचा प्रयत्न करायचो. पण प्रतिमा हो ,नाही ,नको या पलीकडे काही बोलायची नाही. कॉलेज मध्ये सतत नवीन फैशनचे कपडे वापरणारी,सर्वांमध्ये मिसळणारी, अशी उत्साहाचा अवखळ झराच होती ती. कितीही प्रयत्न केला तरी त्या प्रतिमेचा लवलेशहि ह्या प्रतिमेत दिसत नव्हता. आमच्या जिवाभावाच्या मैत्रिणीची अशी अवस्था बघून आम्ही विषण्ण झालो होतो.

त्यारात्री आम्हाला प्रतिमा च्या ओरडण्याने जाग आली.

“मारू नकोस मला प्लीज ,खूप दुखते आहे रे पाठ ,नको नको” असे ओरडत ती उठली.

“प्रतिमा काय झाले सांग ना ,कोण मारतो तुला ? अशोक मारतो का ? तू का

सहन करतेस अशी ?”

प्रतिमा हमसून हमसून रडायला लागली.

“हो फार वाईट आहे ग अशोक. तुम्हाला कल्पना येणार नाही ” प्रतिमा रडत रडत बोलली.

“प्रतिमा,अग बोल ना . मन मोकळे होईल तुझे .पुढे काय करायचं ते आपण नंतर बघू,पण तू अशी गप्प राहू नकोस ” मी म्हटले.

“आणि आम्ही तुझ्या मैत्रिणी आहोत ग. आम्हाला सांगितले तर आम्ही तुला मदत करू .कोणाला सांगणार नाही,तू बिलकुल घाबरू नकोस” अलका तिच्या पाठीवर थोपटत म्हणाली

“आपल्याला कॉलेजमध्ये नाटकात काम करणारा,सगळ्यांशी हसून खेळून वागणारा असा अशोक माहित होता. पण त्याचे मुख्य ध्येय म्हणजे फक्त पैसा आणि पैसा. त्याचे माझ्यावर प्रेम वगैरे काही नव्हते. मी एकुलती एक आणि घरची श्रीमंत म्हणून त्याने माझ्याशी लग्न केलं. आई बाबांचा राग काही दिवसांनी जाईल आणि ते पैश्याची मदत करतील म्हणून तो काही दिवस माझ्याशी बरा वागला,परंतु बाबांनी निलेशला घरी आणले. निलेश म्हणजे माझा छोटा चुलत भाऊ आणि घर त्याला द्यायचे ठरविले आणि अशोकचे डोकेच फिरले.त्याच्या लक्षात आले कि आपल्याला सासरकडून काहीच मदत मिळणार नाही. अशोकला फिल्म इंडस्ट्री मध्ये टिकण्यासाठी पिक्चर काढायचा होता. हे सगळे काही जमले नाही. याचा राग तो माझ्यावर काढत असे ” एवढे सांगून प्रतिमा दमून झोपून गेली.

सकाळी मला राजेशचा फोन आला आणि त्याला मी सगळे सांगितले,तो म्हणाला “काळजी करू नकोस शिलू,तुला पाहिजे ती मदत कर प्रतिमाला.”

नकळत माझ्या मनाने राजेशची आणि अशोकची तुलना केली आणि राजेशचा उमदा, उदार स्वभाव,आपल्याला सर्वंकष मदत करण्याची तयारी या गोष्टी तिला प्रकर्षाने जाणवल्या.ज्याच्या बाहूंवर ती निर्धास्त विसंबू शकते असाच आधार स्त्रीला हवा असतो आणि असा आधार एखादा कणखर पुरुषच देऊ शकतो.

दुसय्रा दिवशी सकाळी प्रतिमा उठून बसली आणि म्हणाली “अलका,शिलू तुम्हाला माहित नाही घनश्याम माझ्यावर किती प्रेम करतो ते. अगं त्याने मला परवाच हिऱ्याचा सेट आणला. हा बघ”प्रतिमाने पर्स मधून काढून सुंदर सेट दाखविला.

**कथा क्र.  ७_४**

आमच्या लक्षात येईना की घनश्याम आणि अशोक वैद्य या नावांचा हा काय गोंधळ हिच्या बोलण्यात चालला आहे ?

मला भूतकाळ आठवू लागला. प्रतिमा पक्की नाटकवेडी होती. केवळ अभिनयापुरतेच त्या पात्राच्या अंतरंगात शिरणे हे नटाला जसे जमले पाहिजे तसेच नाटकातील पात्र व ते वठविणारा नट हे भिन्न आहेत हे भान प्रेक्षकालाही राहिले पाहिजे. घनश्याम या पात्राच्या संदर्भात हे भान अशोक आणि प्रतिमा या दोघांनाही राहत नाही हे मला तेव्हाही जाणवत असे. पण त्याचे परिणाम काय होऊ शकतात याची तेव्हा मला जाण नव्हती. तेव्हढी परिपक्वता माझ्या विचारात तेव्हा आलेली नव्हती.

“अलका मला असे वाटते की आपले अशोकशी लग्न झालेले आहे ही घटना प्रतिमा विसरली आहे, किंवा तिला त्या लग्नाच्या आठवणी नकोशा झाल्याने तिच्या मेंदूने त्या पुसून टाकल्या आहेत.”

“ पण आता अशोक तिचे मुद्दाम हाल करत असूनही तो कॉलेजमध्ये असताना स्मार्ट दिसायचा हा उल्लेख ती अजूनही का करते आहे ?”... अलका म्हणाली.

“ हे बघ तुला आठवते का की अशोक दिसायचा हिरो सारखा, पण त्याचे नुसते वागणेच व्हिलनसारखे नसायचे तर त्याला नाटकातला रोल आवडायचा तो देखील व्हिलनचाच. म्हणूनच तर त्याने हिरोचा

रोल मिळत असूनही घनश्यामचा रोल अगदी आवडीने मागून घेतला होता. आणि त्यामुळेच तो घनश्यामला स्टेजवर अक्षरशः जिवंत करायचा. तो तेव्हा अभिनय करतच नसे तर त्याच्या उत्स्फूर्त दुष्ट स्वभावाला आत्यंतिक आनंद देणारी ती भूमिका तो साक्षात जगत असे.  अट्टल पिणाऱ्याला खूप दिवसानंतर मनसोक्त प्यायला मिळाले की त्याला कसा आनंद होतो तसा ती भूमिका साकार करताना अशोकला होत असला पाहिजे हे माझ्या आता लक्षात येते आहे.”

“ इथपर्यंत मला तुझं म्हणणं पटलं, परंतु अशोकशी झालेलं प्रतिमाचं लग्न ही त्याच्या दुष्टपणामुळे एक शोकांतिका ठरल्याने ती घटनाच जर प्रतिमा विसरू पाहते आहे तर तिला त्याच्यातला घनश्यामच का आठवतो आहे ?” अलकाचा प्रश्न रास्त होता. यावर काहीतरी तर्कशुद्ध आणि बुद्धीगम्य उत्तर असलंच पाहिजे.

“ हे बघ मला असं वाटतं की टीन एजमध्ये बऱ्याच मुलीना खलनायकी व्यक्तिमत्वाच्या पुरुषांची भुरळ पडते. अशोक मुळात तसा होता आणि त्यामुळे तो घनश्यामची भूमिका सुंदर करायचा. त्या भूमिकेचे त्याच्या व्यक्तिमत्वावर चढलेले ते आवरण किंवा तेज प्रतीमाच्या अंतर्मनात कायमचे कोरले गेले असेल. नव्हे त्या अंतर्मनाने खरे तर प्रतिमाचे घनश्यामशीच लग्न झालेले असल्याचे पक्के नोंदवून ठेवलेले आहे. हे बघ अंतर्मनात काय आहे हे फक्त स्वप्नाच्या माध्यमातून कळू शकते किंवा खऱ्या हिप्नोटीझम द्वारे कळू शकते. आपल्या जागृत अवस्थेत अंतर्मन कधीच उघडे होत नाही. आपले आपल्यालाच आपल्या अंतर्मनात काय आहे ते कळू शकत नाही. परंतु

जेव्हा पराकोटीच्या भीती, दुःख किंवा वेदनेच्या धगधगणाऱ्या आचेवर वितळलेल्या काचेसारख्या संवेदना ताणल्या जातात आणि जेव्हा त्या ताणाखाली सेकंदाचा कालावधी देखील सापेक्षतः असह्य लांबत जातो तेव्हा बाह्यमन आणि अंतर्मन यांच्यातला पडदा तात्कालिक किंवा कायमचा नष्ट तरी होतो किंवा सेमीपरमीएबल तरी होतो. ती व्यक्ती अंतर्मनातले विचार काहीकाळ अजाणतेपणे प्रत्यक्ष जगू व अनुभवू लागते. यालाच मनोविकृती किंवा वेड असे म्हटले जाते. प्रत्यक्षात त्या व्यक्तीच्या मनाने अभिव्यक्तीवरील बाह्यमनाचे निर्बंध, संकेत व संस्कार झुगारून दिलेले असतात. प्रतिमा वेडी झालेली नाही पण ती त्या अवस्थेच्या सीमारेषेवर रेंगाळते आहे. आपण तिला तेथून परत आपल्यात आणले पाहिजे. ” मी अलकाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

“ बापरे तू एव्हढ्या सायकोलॉजीचा अभ्यास केव्हा केलास? पण मग ती अशोकची आठवण का काढते ? हे मला कळत नाही.” अलका म्हणाली.

“ मला असे वाटते की तिला अशोकचे रूप आठवते. पण त्याने साकारलेला घनश्याम हा तिला नवरा म्हणून आठवतो. आणि तो आपल्यावर खूप प्रेम करतो या आभासात्मक दुनियेत ती काही काळ जगते तर काहीवेळा अशोक आपले हाल करतो या वास्तवाचेही तिला भान येते. तिला त्याच वास्तवात स्थिर करून ती त्यातून स्वतःच मार्ग काढील इतके तिच्या मनाला खंबीर बनवावे लागेल”.

"अग पण शीलू, जर आपण असं धरुन चाललो की प्रतिमा अजून लतिकेच्या भूमिकेतच वावरते आहे आणि म्हणून तिला अशोक घनःशाम म्हणूनच आठवतो,तर घनःशामला ती नवरा कसं मानेल? घनःशाम हा भावबंधन नाटकातला खलनायक आहे. लतिका फक्त त्याचा तिरस्कारच करते. तिचं प्रेम प्रभाकरवर आहे. आठवतंय नं तुला भावबंधन नाटक? बरं ते जाऊ देत, वास्तवात तिला स्थिर करण्यासाठी आपण psychiatrist कडे नेणंच योग्य ठरेल."

मलाही अलकाचं म्हणणं पटलं. मी तिला दुजोरा दिला."मग नकोच आता वेळ दवडायला.तुझ्या माहितीत आहे का कुणी मानसोपचारतज्ञ?" "मी लगेचच चौकशी करते" अलका म्हणाली.

तीन दिवस झाले, प्रतिमा माझ्याकडेच होती आणि अलका तिच्यासाठी रोज येत होती.आम्ही दोघी रोज प्रतिमाचं brain wash करत होतो. "तुला आधार देणारं कुणीही नसलं तरी आम्ही तुला एकटं सोडणार नाही,काळजी करु नकोस" असं सारखं सांगून तिच्या मनांत सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न युद्धपातळीवर चालू होता.हळू हळू आम्हाला आशेचा किरण दिसू लागला.

प्रतिमा आता बाहेर येऊन बसत होती,तिचा चेहराही जरा जरा खुलत चालला होता.आमच्याबरोबर जेवू खावू लागली होती.अशोक कितीही देखणा असला, तिचं त्याच्यावर कितीही प्रेम असलं तरी इतक्या वर्षांत त्याने तिच्यावर जो अन्याय केलाय तो सहन करणं हाही एक गुन्हाच आहे हे आम्ही एकसारखं तिच्या मनावर बिंबवत होतो.

त्या दिवशी सकाळी सकाळीच अलकाचा फोन आला,"शीलू, डॉ. नाडकर्णींची आज ११वाजताची appointment मिळाली आहे, तेव्हा तुम्ही दोघी तयार रहा. मी १०वाजेपर्यंत येते. प्रतिमाला घेऊन आम्ही डॉक्टरांकडे वेळेवर पोहोचलो.१०च मिनटात आम्हाला आंत बोलाविलं.प्रतिमा काहीच बोलत नव्हती,पण आम्ही तिची इत्थंभूत माहिती डॉक्टरना दिली.गेला आठवडाभर प्रतिमा आमच्याचकडे असल्यामुळे तिच्यात बराच positive बदल झालेला दिसतोय हेही आम्ही डॉक्टरांच्या निदर्शनास आणून दिले. "good" डॉक्टर म्हणाले.त्यांच्या म्हणण्यानुसार काळजीचं काहीच कारण नव्हतं.इतकी वर्ष तिला झालेली मारहाण,तिच्यावर लादलेलं वेडेपण यामुळे ती भेदरलेली आहे आणि तिच्यातला आत्मविश्वास हरवला आहे,तो तिला परत मिळवून देणे आवश्यक आहे.त्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे तिला तिच्या नवऱ्यापासून दूर ठेवणे. डॉक्टरांनी तिचं counseling करण्यासाठी काही दिवस रोज बोलाविलं. जवळ जवळ महिनाभर आम्ही तिला डॉक्टर नाडकर्णींकडे नेत होतो आणि तिच्यात खूपच चांगला बदल आढळत होता.

अलकाने मध्यंतरीच्या काळात तिच्या माहेरचा तपास केला, तिच्या वडीलांचं काही वर्षांपूर्वी निधन झालं होतं, आणि तिची आई अंधेरीला एकटीच रहात होती.भाऊ प्रवीण नोकरीनिमित्त आपल्या

कुटुंबासमवेत बंगलोरला स्थायिक झाला होता. मी व अलकाने तिच्या आईला भेटायचं ठरविलं आणि गेलो. प्रतिमाची कहाणी ऐकून त्या माउलीचं हृदय पिळवटलं."स्वतःच्या हातांनी पोरीनं आयुष्याचं मातेरं केलं ग अगदी! नाही, पण तिची आई चांगली खमकी आहे अजून, मी तिला असं वाऱ्यावर सोडणार नाही आता आणि त्या अशोकलाही सोडणार नाही मुळीच!" त्यांचा संताप अनावर झाला होता."तुम्ही मात्र मैत्रीला जागलात ग पोरींनो!" आईंच्या मुखातून सहज उद्गार निघाले.